# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक २२ मार्च, २०१८

## (सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(मंगळवार, दिनांक १३ मार्च २०१८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु राखून ठेवण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **सर्वश्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, चंद्रदीप नरके, अनिल बाबर वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ऊर्जा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर विद्युत परिमंडळ अंतर्गत माहे मार्च, २०१४ पासून कोल्हापूर जिल्ह्यात ८०५८ तसेच सांगली जिल्ह्यात १२,५६९ शेतीपंप वीज जोडणी प्रलंबित असणे, कोल्हापूर जिल्ह्यातील पायाभूत सुविधा क्र.२ या योजनेंतर्गत शेतीपंपास वीज जोडणी देण्यास मंजुरी देऊन व शेतकऱ्यांनी पैसे भरुनसुद्धा पायाभूत आराखडा मंजूर नसल्याने व त्यासाठी निधी उपलब्ध करून न दिल्याने वीज जोडणी प्रलंबित असणे, ३०३४ वीज मीटरची मागणी असतांना तुटवडा असल्याने अनेक वीज मीटर जोडण्या प्रलंबित असणे, शेतकऱ्यांनी शेतामध्ये बोअर, विहीर व पाईप लाईन टाकणे, मोटार खरेदी करणे ई.कामे केली असून केवळ शेतीपंपासाठी वीज जोडणी अभावी अनेक कामे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, मुख्य अभियंता यांनी माहे ऑक्टोबर, २०१६ व फेब्रुवारी, २०१७ मध्ये शेतीपंप वीज जोडणीसाठी कोल्हापूर जिल्ह्यास सुमारे ८७ कोटी तसेच सांगली जिल्ह्यास सुमारे १५५ कोटी इतक्या निधीची केलेली मागणी, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात शेतीपंप वीज जोडणी देणे व त्यासाठी आवश्यक निधी तत्काळ उपलब्ध करून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. संग्राम थोपटे, अमिन पटेल, अस्लम शेख, भारत भालके, जयकुमार गोरे, अमित झनक, कुणाल पाटील, श्रीमती निर्मला गावित, प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्हयातील भाटघर, वीर व मुळशी धरणांतर्गत पूर्णत: व अंशत: पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांनी निधी उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास अद्यापही शासनाने मान्यता न देणे, भाटघर प्रकल्पांतर्गत पुनर्वसित गावांना पोहोच रस्ते, स्मशानभूमी, बस थांबे, प्रसाधन गृहे, ग्रामपंचायत इमारत इत्यादी

नागरी सुविधांसाठी सन २०१३-१४ या कालावधीत कोटयवधीचा निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला असतांनाही प्रशासनाच्या दिरंगाईमुळे हा निधी अखर्चित राहिल्यामुळे येथील नागरी सुविधांची अपूर्ण असलेली कामे, या प्रकल्पांतर्गत माळवाडी-हर्णस-भुतोंडे या रस्त्यासाठी रु. ९ कोटी ६९ लाखाचा प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे सदर रस्ता वाहतुकीस अत्यंत धोकादायक झाल्यामुळे येथील प्रकल्पासाठी घरे, जमिनी देऊन विस्थापित झालेल्या बाधितांना अनेक गैरसोयीचा सामना करावा लागणे, प्रकल्पबाधितांना उर्वरित नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रु.१२९ कोटींच्या निधीचा प्रस्ताव गत दोन वर्षापासून मंजूरीअभावी शासनाकडे प्रलंबित असणे, त्याचप्रमाणे वीर प्रकल्पांतर्गत २३ गावांसाठी ५१ कोटी रुपये रक्कमेच्या नागरी सुविधांच्या कामाचा प्रस्तावही शासनस्तरावर प्रलंबित असणे, या प्रकल्पांतर्गत सारोळा-न्हावी-गुणंद या नवनिर्मिती झालेल्या राज्यमार्गासाठी रु. ५ कोटी ५१ लाखाचा निधी अद्यापही उपलब्ध करुन न देणे, भाटघर, वीर व मुळशी येथील नागरी सुविधांची कामे निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देऊन प्रलंबित कामे तातडीने पुर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **ॲड. राहुल कुल, श्री. दत्तात्रय भरणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील भामा आसखेड प्रकल्पासाठी शासनाने जमिनी संपादन करणे, प्रकल्पाचे काम पूर्ण होत असतानाच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामधून दौंड तालुक्यातील गावांना वगळून पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी सदर पाणी आरक्षित करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने पुणे महानगरपालिकेचा पाणी वापर ८.५ टीएमसी पर्यंत मर्यादित ठेवण्याचा दिलेला निर्णय, पुणे महानगर पालिकेकडे प्रत्यक्षात ११.५ टीएमसी पाणी वापराचा शासनाचा परवाना असल्याने भामा आसखेडच्या पाण्याची आवश्यकता नसणे किंवा कायदेशीररित्या सदर पाणी आरक्षित करणे शक्य नसणे, मा.लोकप्रतिनिधी यांनी दौंड तालुक्यातील गावे वगळू नये यासाठी वारंवार मागणी करुनही कोणतीच कार्यवाही न होणे, भामा आसखेड प्रकल्पासाठी संपादित केलेल्या काही जमिनींचे गुंजवणी प्रकल्पग्रस्तांसाठी बेकायेशीरपणे वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न होणे, सदर वाटप रद्द करण्यासाठी शासनस्तरावर २ वेळा बैठका घेऊनही कुठलाही निर्णय न होणे, त्यामुळे जलसंपदा विभागाने दौंड तालुक्यातील गावे भामा आसखेड प्रकल्पातुन वगळण्याचा निर्णय रद्द करणे, गुंजवणी प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या जमिनींचे वाटप रद्द करून बेकायदेशीररित्या वाटप करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **सार्वजनिक आरोग्य विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा पस्तिसावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : विधानसभा विशेषाधिकार समितीचा खालील प्रकरणासंदर्भातील अहवाल सादर करणे :-**

सन्माननीय विधानसभा सदस्या श्रीमती दिपिका चव्हाण यांनी श्री.सुनिल सौंदाणे, तहसिलदार, बागलाण, जि.नाशिक यांचेविरुद्ध उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

**पाच : सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. (सहावा व शेवटचा दिवस)**

(१) सामान्य प्रशासन विभाग.

(२) गृह विभाग.

(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

(४) सार्वजनिक बांधकाम विभाग.

(५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**[ चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ५.३० वाजता ]**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

(१) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ — महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) विधेयक, २०१८.**

(२) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ — महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१८.**

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अबु आझमी, भारत भालके, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ — महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ — भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, अमर**

**काळे, सुनिल केदार, अमिन पटेल, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमित झनक, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका**

**(सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, डी.पी.सावंत, बाळासाहेब थोरात, अमिन पटेल, वसंतराव चव्हाण, त्र्यंबकराव भिसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, हर्षवर्धन**

**सपकाळ, राहुल बोंद्रे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(५)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – जी.एच.रायसोनी विद्यापीठ, अमरावती, विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, कुणाल**

**पाटील, वसंतराव चव्हाण, त्र्यंबकराव भिसे, डी.पी.सावंत, अमिन पटेल, शेख आसिफ शेख रशीद, संग्राम थोपटे, अमर काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – जी.एच.रायसोनी विद्यापीठ, अमरावती, विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – जी.एच.रायसोनी विद्यापीठ, अमरावती, विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अमित झनक, संग्राम थोपटे, हर्षवर्धन सपकाळ, जयकुमार गोरे, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – जी.एच.रायसोनी विद्यापीठ, अमरावती, विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(६)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ – महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, कुणाल पाटील, वसंतराव चव्हाण, त्र्यंबकराव भिसे, डी.पी.सावंत, अमिन पटेल, शेख आसिफ शेख रशीद, संग्राम थोपटे, अमर काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ – महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ – महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ – महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अमित झनक, संग्राम थोपटे, हर्षवर्धन सपकाळ, जयकुमार गोरे, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ – महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(७)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनील केदार, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा

महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(८) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ – महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) विधेयक, २०१८.**

---

**सात : (बुधवार, दिनांक २१ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, मो. आरीफ नसीम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकरराव चव्हाण, ॲड यशोमती ठाकूर, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री. अमिन पटेल, डि. एस. अहिरे, राहुल मोटे, डी. पी. सावंत, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, नितेश राणे, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, रणजित कांबळे, डॉ. संतोष टारफे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशिराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, कु. प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, भारत भालके, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, राहुल जगताप, नरहरी झिरवाळ, अमित देशमुख, प्रदिप जाधव-नाईक, धैर्यशील पाटील, श्रीमती सुमन पाटील, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील कायदा व सुव्यवस्था नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा व पोलिसांचाही धाक नसणे, पोलिसांवर वारंवार होणारे हल्ले, मोकाट सुटलेले सायबर गुन्हेगार, आर्थिक अडचणीमुळे पोलिसांच्या घराचा प्रश्न अधांतरी असणे, उपनगरीय गाड्यांमध्ये महिला प्रवाशांवर होणारे हल्ले व विनयभंगाचे वाढते प्रमाण, पेट्रोल चोरीचे आधुनिक तंत्र, पोलीस दलातच महिला पोलिसांवर त्यांच्या वरिष्ठांकडून होणारे अत्याचार, उच्चभ्रू वर्गात अंमली पदार्थांचा वाढता वापर, लोकप्रतिनिधींच्या पत्रांना उत्तर अथवा माहिती अधिकार कायदयानुसारही माहिती न मिळणे, त्यातून सामान्यांची होणारी उपेक्षा तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यांवर पोलिसांचे हल्ले व माहिती देण्यास नकार, अनधिकृतपणे राज्यात सुरु असलेल्या सुरक्षा एजन्सीज, अल्पवयीन मुली व मुले यांच्यावर होणाऱ्या अत्याचारात झालेली वाढ, दरोड्याचे वाढते प्रमाण, वारंवार होणाऱ्या घरफोडी, रस्त्यावरील वाहन अपघातांचे वाढते प्रमाण, त्यात होणारी जिवीत व वित्तहानी, जातपंचायतीचा वाढता प्रभाव, भीमा-कोरेगावसारख्या घटनांमुळे दलितांमध्ये निर्माण झालेली दहशत व भीतीचे वातावरण, प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे जागेवर बसूनच वाहने प्रमाणित करण्यात येणे, वाहतुकीची मोठ्या प्रमाणात होणारी कोंडी, नियम डावलून वाहनयोग्यता प्रमाणपत्राचे वितरण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/जमाती) उद्योगासाठी विशेष सामूहिक

प्रोत्साहन भत्ता योजनेची प्रभावी अंमलबजावणी न होणे, वारंवार तोट्यात चालणारे एस.टी. महामंडळ, मोडकळीस आलेल्या बसेस, परिणामी प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येणे, अनावश्यक बुलेट ट्रेन व हायपरलुप सारख्या दिवास्वप्नांनी जनतेला घातलेली भुरळ, सागरी सुरक्षा व्यवस्थेकडे झालेले दुर्लक्ष, सागरी आयुक्तालयाची प्रलंबित मागणी, कोकणातील बंदरांचा विकास करण्याकडे झालेले दुर्लक्ष, परिणामी कोकणवासीय जनतेत शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष, राज्यात आयोजित केलेल्या मॅग्नेटिक महाराष्ट्र परिषदेच्या माध्यमातून १२ लाख १० हजार ४६४ कोटी रुपये गुंतवणुकीचे ४ हजार १०६ सामंजस्य करार झाले असल्याचा शासनामार्फत करण्यात आलेला दावा, तथापि, प्रत्यक्षात हे सर्व करार म्हणजे दिखाऊपणा असल्याचे निदर्शनास येणे, "मेक इन इंडिया" च्या धर्तीवर महाराष्ट्रात स्थापन करण्यात आलेली "मेक इन महाराष्ट्र" परिषद, तथापि, राज्यात गुंतवणूक वाढण्याऐवजी उद्योजकांनी आपली गुंतवणूक काढून घेणे, यावरुन मेक इन महाराष्ट्र ते मॅग्नेटिक महाराष्ट्र हा एक प्रकारे आभास निर्माण केला असल्याचे निदर्शनास येणे, महाराष्ट्रात सन २०२५ पर्यंत एक लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याचे स्वप्नचित्र शासन बघत असताना कारखानदारीकडे दुर्लक्ष झाल्याची खंत महिंद्रा अँड महिंद्राच्या व्यवस्थापकांनी व्यक्त करणे, विविध प्रकारच्या जाचक अटींमुळे राज्यातील उद्योग बंद पडून बेरोजगारांच्या संख्येत झालेली वाढ."

**आठ : (बुधवार, दिनांक २१ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री शंभुराज देसाई, प्रशांत बंब, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री. राजाभाऊ वाजे, राजेंद्र पाटणी, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. बाबुराव पाचर्णे, शिवाजीराव नाईक, डॉ. जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुरेश हाळवणकर, प्रकाश आबिटकर, संतोष दानवे, अनिल बाबर, शिवाजीराव कर्डिले, उल्हास पाटील, सुधाकर देशमुख, सुभाष साबणे, उन्मेश पाटील, ज्ञानराज चौगुले, रणधीर सावरकर, किशोर पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, प्रा. चंद्रकांत सोनावणे, प्रा. मेधा कुलकर्णी, श्री. हर्षवर्धन जाधव, ॲड. राहुल कुल, सर्वश्री. सुरेश धानोरकर, समीर कुणावार, अनिल कदम, डॉ. सुनिल देशमुख, सर्वश्री. शांताराम मोरे, रमेश बुंदिले, सुभाष भोईर, अनिल गोटे, सुरेश गोरे, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री विजय औटी, चरण वाघमारे, नारायण पाटील, डॉ. विजयकुमार गावीत, सर्वश्री. भरतशेठ गोगावले, विनायकराव जाधव-पाटील, सदानंद चव्हाण, डॉ. सुरेश खाडे, श्री. राजन साळवी, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री. राजेश क्षीरसागर, हरिभाऊ जावळे, चंद्रदिप नरके, सुधाकर भालेराव, सत्यजित पाटील-सरुडकर, डॉ. पंकज भोयर, डॉ. सुजित मिणचेकर, सर्वश्री संजय सावकारे, संजय शिरसाट, सुरेश भोळे, योगेश घोलप, राजेंद्र नजरधने, अमित घोडा, ॲड. भिमराव धोंडे, सर्वश्री वैभव नाईक, उदेसिंग पाडवी, उदय सामंत, डॉ. आशिष देशमुख, ॲड. गौतम चाबुकस्वार, सर्वश्री. किर्तीकुमार भांगडिया, मनोहर भोईर, तान्हाजी मुटकुळे, रुपेश**

**म्हात्रे, बाळासाहेब मुरकुटे, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री डि. मल्लीकार्जुन रेड्डी, संदिपान भुमरे, कृष्णा गजबे, डॉ. देवराव होळी, डॉ. संजय कुटे, सर्वश्री संजय केळकर, सर्वश्रीमती सीमा हिरे, स्नेहलता कोल्हे, श्री हरिष पिंपळे, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री महेश लांडगे, मोहन फड, अमल महाडिक, अतुल सावे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील सिंचनाच्या अपूर्ण असलेल्या प्रकल्पांना पुरेसा निधी उपलब्ध करणे, अनुशेषांतर्गत प्रकल्प, झुडपी जंगलांमुळे अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी पर्यावरणदृष्टया असलेले अडसर दूर करणे, भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाची गती वाढवून प्रकल्पग्रस्तांचे परिपूर्ण पुनर्वसन करण्याकरिता कालबध्द कार्यक्रम राबविणे, जलवितरण व लाभक्षेत्र विकास अंतर्गत प्रत्येक सिंचन महामंडळात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत करावयाची कामे, कृष्णा खोऱ्यातून मराठवाडयासाठी २८ टीएमसी पाणी मिळण्यासाठी पाऊल उचलण्याची गरज, पिण्याचे पाणी, औद्योगिक व कृषी वापराचे पाणी यांचे नियोजन करणे, कालव्याऐवजी पाईप लाईनने सिंचन करणे, सर्व प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे, कालव्याची व उपसा सिंचन योजनांची कामे करुन शेतकऱ्यांना जलसक्षम करणे, उपसा सिंचन योजनेवर सौरऊर्जापंप बसविणे, लाभक्षेत्राबाहेर होणारी पाण्याची चोरी रोखणे, गोदावरी व तापी खोरे जलनियोजन आराखडा तयार करणे, वैनगंगा व नळगंगा जोड प्रकल्प व कन्हान-वर्धा बोगद्याद्वारे नदीजोड प्रकल्पाचा तातडीने अभ्यास करुन हा प्रकल्प कार्यान्वित करणे, पेणटाकळी, खडकपूर्णा, जिगाव व गोसीखुर्द इ. प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम आखणे, राज्यातील बहुतांश पाझर तलाव सन १९७२ ते १९८० च्या दुष्काळादरम्यान तयार केलेले असल्याने त्याची सिंचन क्षमता तपासून पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता, शिवकालीन बारव, पायविहिर, चौकोनी विहिर अशा प्राचीन जलस्त्रोतांचे जतन व संवर्धन करण्याची आवश्यकता, हिंगोली जिल्हयातील पूर्णा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्यासाठी व ज्या प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळालेले आहे त्या प्रकल्पांसाठी प्रशासकीय मान्यता देऊन काम सुरु करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजना अधिक गतीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, राज्यातील जलदगतीने पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांचा पंतप्रधान सिंचन प्रकल्प योजनेत समावेश केला असणे, सन २००८ मध्ये कर्जमाफी न झालेल्या शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा व दीड लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत शासनाने केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने तसेच आदिवासी वनजमिनींचे सर्व दावे ६ महिन्यांत निकाली काढण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ** : **सर्वश्री. अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अबु आझमी, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. हसन मुश्रीफ, सुनिल केदार, संदीप नाईक, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश**

**पाटील, सर्वश्री. मो. आरीफ नसीम खान, राजेश टोपे, अमित देशमुख, दिलीप सोपल, डि. एस. अहिरे, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. बबनवराव शिंदे, मधुकरराव चव्हाण, राहुल मोटे, डी. पी. सावंत, मकरंद जाधव-पाटील, कालिदास कोळंबकर, सुरेश लाड, बसवराज पाटील, शिवेंद्रसिह भोसले, वसंतराव चव्हाण, दत्तात्रय भरणे, अमिन पटेल, बाळासाहेब पाटील, ॲड. के.सी.पाडवी, सर्वश्री. कुणाल पाटील, संग्राम जगताप, काशिराम पावरा, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, हनुमंत डोळस, अवधूत तटकरे, नितेश राणे, विजय भांबळे, वैभव पिचड, अमर काळे, पांडुरंग बरोरा, अमित झनक, दिपक चव्हाण, रणजित कांबळे, सर्वश्रीमती सुमन पाटील, अमिता चव्हाण, श्री. प्रदिप जाधव-नाईक, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. शेख आसिफ शेख रशीद, राहुल जगताप, श्रीमती निर्मला गावित, श्री. अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबकराव भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, पंकज भुजबळ, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

" राज्यातील उद्योगाला चालना मिळून उद्योगाची भरभराट व्हावी तसेच शहरी व ग्रामीण भागातील अल्पशिक्षित, सुशिक्षित लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा या उद्देशाने शासनाने सन १९६४ मध्ये उद्योग संचालनालयाची स्थापना करणे, महाराष्ट्र कारखाना कामगार अधिनियम, १९४८ नुसार विविध उद्योगामध्ये राज्यातील उमेदवारांना नोकरी मिळण्यासाठी व त्यांचे वेतन भत्ते, रजा व इतर सुविधांबाबतच्या तरतूदी करणे, अलिकडच्या काळात झालेल्या तांत्रिक तसेच संगणकीय शिक्षण पध्दतीमुळे टाळेबंदी, कारखाना दिवाळखोरीत काढणे, कारखान्याचे स्थलांतर आदी कारणामुळे कामगार कपात करण्याची कारखानदारांची प्रवृत्ती, राज्यातील अंगणवाडी सेविका मदतनीस व आशाताई म्हणून काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यासाठी केलेला बेमुदत संप, शासनाने या मागण्याबाबत सहानुभूतीने विचार करण्याचे आश्वासन देऊन देखील त्याप्रमाणे अद्याप कार्यवाही न करणे, राज्यातील शिक्षकांनी व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी केलेला बेमुदत संप, शासकीय कर्मचाऱ्यांनी सातवा वेतन आयोग व निवृत्तीची वयोमर्यादा वाढविण्याबाबत पुकारलेला संप, एस. टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ व इतर मागण्यांसाठी केलेला संप, शासनाच्या विविध विभागातील अ ते ड श्रेणीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची जवळजवळ २ लाख पदे रिक्त असतांना संगणकीकरण, आऊट सोर्सिंग व विशेषज्ञ या नावाखाली ३० टक्के याप्रमाणे जवळजवळ ५.५० लाख पदे रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेणे, एकीकडे उद्योगधंदा वाढविण्याबाबतची घोषणा करुन रत्नागिरी जिल्हयात होऊ घातलेल्या नाणार औष्णिक प्रकल्पाची घोषणा करुन लगेच सदर प्रकल्प बंद करण्याची घोषणा करणे, कामगार खाते व अधिकाऱ्यांवर शासनाचा वाढता दबाव, माथाडी मंडळे मोडीत काढून तेथे एक महामंडळ नेमण्याचे शासनाचे धोरण, त्याविरुध्द कामगारांचा विरोध, शासनाच्या प्रत्येक विभागात सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना एक रकमी वेतन करार पध्दतीने नोकऱ्या देणे, नविन भरती न करणे, परिणामी सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढणे, महाराष्ट्राला एक नंबरचे राज्य

करण्याच्या अट्टाहासापोटी मेक इन इंडियाच्या नावाखाली मेक इन महाराष्ट्र, स्टार्ट अप, अमृतसिटी, स्मार्ट सिटी, समृध्दी महामार्ग यासारखे खर्चिक प्रकल्प कार्यान्वित करण्याचा केलेला अट्टाहास, महाराष्ट्र नं. १, मॅग्नेटीक महाराष्ट्र अशा केवळ प्रसिध्दीसाठी केलेल्या सदर प्रकल्पामुळे राज्यात ३८.८३ लाख नोकऱ्या, ५० लाख तरुण-तरुणींना कौशल्य प्रशिक्षण देणे, मॅग्नेटीक महाराष्ट्रामधून ३६ लाख ७७ हजार नोकऱ्या उपलब्ध होतील असे दिशाभूल करणारे आश्वासन तरुणांना देणे, केंद्रीय कामगार मंत्रालयाने नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणानुसार कारखानदारीच्या क्षेत्रात ५४ हजार कंत्राटी व ७२ हजार हंगामी नोकऱ्यांवर आलेले गंडांतर, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २००२ मध्ये कामगार धोरणाविरुध्द सुधारणा करण्यास सुरक्षा रक्षक संघटनांनी केलेला विरोध, शासनाने आततायीपणे निर्णय घेतल्यास सुरक्षा रक्षक संघटनांकडून तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, कामगार आयुक्तालयात उपायुक्त वा तत्सम दर्जाची अनेक पदे रिक्त असल्याने कामाच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांची वरिष्ठांकडून होणारी छळवणूक व अत्याचाराला आळा घालण्यासाठी करावयाची उपाययोजना, राज्यात आजघडीला सुशिक्षित बेरोजगार तरुणांची ६० लाखापर्यंत पोहचलेली संख्या, त्यापैकी केवळ १ टक्का बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन दिले जात असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने मध्यतंरी हमाल (कुली) या पदासाठी इयत्ता ४ थी अशी शैक्षणिक पात्रता असतानाही या पदासाठी उच्च विद्याविभूषित सुशिक्षित बेरोजगारांचे २४२४ इतके आलेले अर्ज, उच्चशिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने समाज विघातक कृत्य करणाऱ्या टोळ्यांमध्ये सामील होण्याकडे तरुणांचा वाढत असलेला कल, मुंबईतील कामगार न्यायालयात ८१४२ पेक्षा जास्त खटले प्रलंबित असून त्यापैकी १२२ खटले तर गेल्या दहा वर्षापासून निर्णयाअभावी प्रलंबित असणे, राज्यात राज्यस्तरावर कामगारांसंदर्भात असलेल्या ७ कायद्यांची अंमलबजावणी परिणामकारक करुन कामगारांना न्याय न देण्याचे आडमुठे धोरण शासनाने अवलंबिणे, शासनाच्या उद्योग व कामगार विभागामध्ये परस्पर समन्वय नसणे ही बाब विचारात घेता शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(गुरुवार, दिनांक १५ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना (सूचना क्र. १ ते ९)**

**(१) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालुक्याची सन १८७४ मध्ये तसेच सावली तालुक्याची सन १९९२ मध्ये निर्मिती होऊनही अद्यापि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन न होणे, ब्रम्हपूरी व सावली हे दोन्ही तालुके धान उत्पादक म्हणून राज्यात प्रसिध्द असून या

ठिकाणी एकही उद्योजक उद्योग सुरू करण्यास तयार नसल्यामुळे बेरोजगारांचे रोजगारासाठी शहराकडे होत असलेले स्थलांतर, प्रत्येक तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करावे असा शासनाचा निर्णय असतांनाही या दोन्ही ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन न केल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, परिणामी ब्रम्हपूरी आणि सावली येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(२) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सिंदेवाही (जि. चंद्रपूर) येथील तहसिल इमारत जुनी असून वाढत्या कामकाजाच्या व्यापामुळे सदर इमारत अपुरी पडणे, तालुका स्तरावरील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये एकाच इमारतीमध्ये सुरू करण्याकरिता सिंदेवाही येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी १२ कोटी ३५ लाख रुपयांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी शासनास सादर करुन सुमारे दीड वर्षाचा कालावधी होऊनही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, सिंदेवाही येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(३) श्री. संजय केळकर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"ठाणे शहरात सुमारे ७० हजार भटके कुत्रे असून दरवर्षी ही संख्या दुप्पटीने वाढत असणे, महापालिका हद्दीत श्वान दंशाच्या अंदाजे ३० घटना घडत असून त्यामुळे अनेक जण जखमी होणे, देशात रेबिजमुळे ३५ हजार नागरिकांचा होत असलेला मृत्यु, श्वान दंशावरील लस अथवा औषधे सहजासहजी उपलब्ध होत नसल्याने रुग्णांच्या नातवाईकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, परिणामी यावर आळा घालण्यासाठी श्वान नसबंदी मोहीम मोठ्या प्रमाणात राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(४) श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"केंद्र शासनाने मुंबई शहरास स्मार्ट सिटी म्हणून घोषित करणे, स्मार्ट सिटी अंतर्गत

देण्यात येत असलेल्या सुविधांमध्ये परिवहन सुविधा महत्वाची असून गत १५ वर्षात २७६६.७० कोटी रुपये इतका तोटा झाला असून बेस्ट उपक्रमावर तेवढेच कर्ज असणे, सदर कर्जाची परतफेड वेळेत न झाल्यास हा उपक्रम बंद होण्याची भिती, बेस्ट उपक्रम बंद झाल्यास ४६ हजार कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांवर उपासमारीचे संकट निर्माण होण्याची शक्यता, सबब, दिल्ली व कर्नाटक राज्याच्या धर्तीवर बेस्ट उपक्रमास सहाय्यनिधी देऊन नव संजिवनी देण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) डॉ. मिलिंद माने, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"नागपूर महानगरपालिकेने कामगारनगर, नारी सिंग रोड, नागपूर येथे आयसोलेशन रुग्णालयासाठी जागा निश्चित करणे, नागपूर येथील रुग्णालयात गॅस्ट्रो व इतर रुग्ण मोठया प्रमाणात आढळून येत असून इमामवाडा येथे एकमेव रुग्णालय असून त्याची रुग्णक्षमता अल्प प्रमाणात असल्यामुळे अनेक रुग्णांचा उपचाराअभावी झालेला मृत्यू, त्यामुळे नागपूर शहरात आयसोलेशन रुग्णालयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(६) श्री. मंगलप्रभात लोढा, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई, ठाण्यात ९० हजार पोलीस कार्यरत असून त्याप्रमाणात पोलीस वसाहतींची संख्या नगण्य असणे, मुंबई शहरातील जुन्या पोलीस वसाहतीमधील निवासस्थानाची झालेली दूरवस्था, पुरेशी जागा नसल्याने कर्मचाऱ्यांना पानकापड, टीनपत्रे उभारून नवीन खोली करून राहावे लागत असणे, पावसाळ्यात घरे गळत असल्यामुळे पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांचा प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित असून सदर प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

**(७) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सावली (जि. चंद्रपूर) येथील २७ वर्षे जुनी पाणी पुरवठा योजना नादुरुस्त असल्यामुळे पाणी पुरवठा अनेकवेळा बंद राहत असून नागरीकांना पाण्यापासून वंचित रहावे लागणे, २२ गावांच्या टेकडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची विद्युत देयके ग्रामपंचायतीने भरली नसल्यामुळे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना वारंवार बंद राहणे, सावली नगरपंचायतीने महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सावली येथे जलशुध्दीकरण केंद्रासह वाढीव स्वतंत्र पाणी पुरवठा योजना मंजूर करुन त्यास निधी

उपलब्ध करुन देण्याचा परिपूर्ण प्रस्ताव पाठवूनही शासनाने अद्यापि मंजूरी न दिल्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, सावली येथे जलशुध्दीकरण केंद्रासह स्वतंत्र वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास तातडीने प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(८) श्री. संग्राम थोपटे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"शासकीय आश्रमशाळांना अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून होणारा स्वस्त धान्य पुरवठा माहे एप्रिल, २०१७ पासून बंद करण्यात आल्यामुळे शाळा व्यवस्थापनाला खुल्या बाजारातून ३ ते ४ हजार रुपये क्विंटल दराने धान्य विकत घ्यावे लागणे, परिणामी त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, शासनाकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या अनुदानातून निवासी विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास, आरोग्य व इतर सुविधा वाढत्या महागाईमुळे पुरविणे शक्य होत नसल्याने स्वस्त धान्य पुरवठा पूर्ववत सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) ॲड. आशिष शेलार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईसह राज्यात गेल्या वर्षी दोन लाख नव्या क्षयरोग रुग्णांची नोंद होऊन त्यापैकी १ हजार रुग्णांचा पुरेशा उपचाराअभावी झालेला मृत्यू, राज्यात आढळून आलेल्या क्षयरोगाच्या रुग्णांपैकी ६६ टक्के रुग्ण हे मुंबई शहरातील असणे, मुंबईत गर्दीने भरलेल्या लोकलमधून प्रवास करणे, दाट लोकवस्ती, कोंदट घरे, प्रदूषण, कुपोषण, अपुरे उपचार यांसह विविध कारणांमुळे क्षयरोग मोठ्या प्रमाणावर पसरणे, सन २०२५ पर्यंत देशातून क्षयरोग हद्दपार करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले असून क्षयरोग निर्मूलनासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना क्र. १० व ११)**

**(१०) कुमारी प्रणिती शिंदे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील वस्त्रोद्योगाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी उद्योगांना सोयी सवलती देण्याबरोबर कापूस ते गारमेंट अशी उत्पादन साखळी निर्माण करण्यासाठी नेमलेल्या समितीने शासनास सन २०१५ मध्ये अहवाल सादर करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी वस्त्रोद्योग व्यावसायिकांमध्ये पसरलेला असंतोष, वस्त्रोद्योग धोरणाची

तातडीने अंमलबाजवणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(११) श्री. जयकुमार गोरे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यातील जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेसाठी १,०८५ कोटी रुपयांच्या सुधारित प्रकल्प अहवालास मान्यता देऊनही केवळ २० कोटी रुपये मंजूर केल्यामुळे प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु असणे, माण तालुक्यातील बोगद्याचे कामही बंद ठेवण्यात येणे, शासनाने सन २०१५ मध्ये सदर योजना २ वर्षात पूर्ण करण्याचे आश्वासन देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, सदर सिंचन योजनेचे काम लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी व त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २१ मार्च, २०१८

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.